Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०९ जुन, २०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

✍: 7276494810 (PRO)


# बल्लारशाह आणि वरोरा येथे दाखल खुनाच्या गुन्हयातील आरोपींना अटक

पोलीस स्टेशन बल्लारशाह हद्दीत मौजा आसेगाव येथील रहिवासी सुकरू वाघु सिडाम वय ७० वर्ष रा. आसेगाव हे आणि त्यांचा चुलत भाटवा विलास विठोबा मडावी वय ५० रा. आसेगाव हे त्यांचे घराच्या बाजुला असलेल्या जागेच्या मालकी हक्कावरून मागील एक वर्षापासुन भांडण करीत होते. दिनांक ०७/०६/२०२० रोजी रात्रीच्या सुमारास याच वादावरून भांडण करून आरोपी विलास मडावी याने सुकरू सिडाम यास डोक्यावर दगडाने मारूण गंभीर जखमी केले. त्यांना उपचाराकरीता सामान्य रूग्णालय चंद्रपुर येथे भरती केले असता त्यांचा मृत्यु झाला. यावरून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. ४१०/२०२० कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन विलास विठोबा मडावि वय ५० रा. आसेगाव यास अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास बल्लारशाह पोलीस करीत आहे.

तसेच पोलीस स्टेशन वरोरा येथे दिनांक ०७/०६/२०२० रोजी ४६/२०२० प्रमाणे मर्ग दाखल करण्यात आला होता. सदर मर्गच्या तपास सपोनि. श्री. सतिश सोनटक्के हे करीत होते. तपासात मृतकाच्या डोक्याचे मागील बाजुस खोल जखम असल्याने तसेच मृतकाच्या गळया भोवती काळे व्रण असल्याचे दिसुन आले. सदर बाबत उपजिल्हा रूग्णालय वरोरा यांचे कडुन मृत्युचे कारण हे गळा आवळुन तसेच डोक्याला मार लागल्याने मृत्यु झाला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार सखोल तपास करून मृतकाचा नातु नामे वैभव अशोक भोयर वय २३ रा. तुळाणा, ता. वरोरा. जि.चंद्रपुर याचे कडे सखोल तपास केला असता, त्यानेच गुन्हा केल्याचे कबुल केले. यावरून पोलीस स्टेशन वरोरा येथे अप.क्र. ४१५/२०२० कलम ३०२, २०१ भादंवि अन्वये सहायक पोलीस निरीक्षक सतिश सोनटक्के यांचे फिर्यादिवरून गुन्हा नोंद करण्यात आला असुन आरोपी वैभव अशोक भोयर यास अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास वरोरा पोलीस करीत आहे.

सदरच्या गुन्हयाचा उलगडा मा. पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेड्डी आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा श्री. स्वप्निल जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा श्री. निलेश पांडे यांचे नेतृत्वात पोनि. बल्लारशाह श्री. एस.एस. भगत, पोनि. वरोरा श्री. उमेश पाटील यांचे अधिनस्त अधिकारी आणि कर्मचारी यांनी केला.